मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी चिंचवड महापालिकेचे नवीन बोधचिन्हास स्थायी समितीची मंजुरी

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकृत बोधचिन्हाबाबत एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरगामी निर्णय घेण्यात आला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकृत बोधचिन्हाबाबत (LOGO) एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि दूरगामी निर्णय घेण्यात आला आहे. महापालिकेच्या आगामी बोधचिन्हामध्ये आता छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ प्रतिमेचा आणि "कटिबद्ध जनहिताय" या प्रेरणादायी ब्रीदवाक्याचा अधिकृतपणे समावेश करण्यात आला असून, या महत्त्वपूर्ण विषयास स्थायी समितीची मंजुरी मिळाली आहे. स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी या विषयास मंजुरी दिली आहे.




या संदर्भातील प्रशासनाच्या ठरावानुसार, महानगरपालिकेच्या नवीन म्युरल किंवा बोधचिन्हाचा अंतिम नमुना मान्य करण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा व राजसत्तेच्या लोककल्याणकारी मूल्यांचा आदर्श समोर ठेवून या बोधचिन्हाची रचना करण्यात आली आहे. महापालिकेच्या वतीने जनहिताची कामे करताना हे बोधचिन्ह व त्यावरील "कटिबद्ध जनहिताय" हा संदेश प्रशासकीय व सामाजिक बांधिलकीची साक्ष देणार आहे.

हा अंतिम नमुना मान्य झाल्यानंतर, आता आवश्यकतेनुसार योग्य आकारमानात महानगरपालिकेच्या सर्व मुख्यालयामध्ये, तसेच विविध विभागांच्या इमारतींमध्ये दर्शनी ठिकाणी हा बोधचिन्ह फलक लावण्यात येणार आहे. या संपूर्ण प्रक्रियेची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी आणि त्यासंदर्भातील पुढील सर्व आवश्यक प्रशासकीय कार्यवाही वेगाने पूर्ण करण्यास प्रशासकीय पातळीवर मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

# अंमली पदार्थमुक्त शैक्षणिक परिसरासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांचा पुढाकार

## शहरातील सुमारे 600 शाळा व महाविद्यालयांमधील जवळपास 1,100 प्राचार्य, मुख्याध्यापक आणि शिक्षक प्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांच्या विळख्यातून दूर ठेवून शैक्षणिक परिसर पूर्णपणे 'ड्रग-फ्री कॅम्पस' करण्याच्या उद्देशाने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने ताथवडे येथील श्री बालाजी युनिव्हर्सिटीमध्ये भव्य जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात शहरातील सुमारे ६०० शाळा व महाविद्यालयांमधील जवळपास १,१०० प्राचार्य, मुख्याध्यापक आणि शिक्षक प्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



या कार्यक्रमात पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी विद्यार्थ्यांमध्ये अंमली पदार्थविरोधात व्यापक जनजागृती निर्माण करण्याचे आवाहन केले. पोलीस, शैक्षणिक संस्था, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्या संयुक्त सहभागातून प्रत्येक शाळा व महाविद्यालय 'ड्रग-फ्री कॅम्पस' बनविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी प्रत्येक शैक्षणिक संस्थेमध्ये NARCOTICS PREVENTION COMMITTEE स्थापन करणे, विद्यार्थी स्वयंसेवक नियुक्त करणे, 'ड्रग-फ्री कॅम्पस अ‍ॅक्शन प्लॅन' तयार करणे, जनजागृती स्पर्धा, व्याख्याने, कार्यशाळा, पथनाट्य, रॅली तसेच पालकांसाठी विशेष जागृती सत्रांचे आयोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या वर्तनातील संशयास्पद बदल वेळेत ओळखून त्यांच्याशी संवेदनशील संवाद साधण्यावरही भर देण्यात आला

अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) सारंग आवाड यांनी प्रास्ताविक करताना अंमली पदार्थांचे सेवन ही केवळ एका व्यक्तीची समस्या नसून त्याचा परिणाम कुटुंब, शिक्षण, आरोग्य आणि संपूर्ण समाजावर होत असल्याचे सांगितले. व्यसनमुक्त विद्यार्थी आणि व्यसनमुक्त महाराष्ट्र घडविण्याचा संकल्प या अभियानामागे असल्याचे त्यांनी नमूद केले.

# 'नाशिक फाटा–खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर'साठी भूसंपादन 'मार्किंग' सुरू

## पिंपरी-चिंचवडसह चाकणच्या औद्योगिक विकासाला मिळणार नवी चालना; भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला प्रशासनाचे बळ

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडसह चाकण आणि खेडच्या औद्योगिक पट्ट्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या नाशिक फाटा–खेड एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला आता गती मिळाली आहे. या प्रकल्पासाठी नगरविकास विभागाकडून आज मार्गाचे मार्किंग सुरू झाले असून, भूसंपादन प्रक्रियेलाही वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या प्रयत्नांना बळ मिळाले आहे.



नाशिक फाटा–खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर हा केवळ वाहतूक कोंडी सोडविणारा प्रकल्प नसून पुणे–पिंपरी-चिंचवड–चाकण–खेड या संपूर्ण औद्योगिक पट्ट्याच्या विकासाला गती देणारी महत्त्वाची पायाभूत सुविधा आहे. या मार्गामुळे नाशिक फाटा, भोसरी, मोशी, चाकण आणि खेड परिसरातील वाढत्या वाहतुकीचा ताण कमी करण्यास मदत होणार आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला मंजुरी दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी वेगाने व्हावी, यासाठी आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पाचे भूसंपादन पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात व्हावी, यासाठी संबंधित यंत्रणांशी समन्वय साधत प्रकल्पाला गती देण्याची भूमिका त्यांनी घेतली. तसेच, विधानसभा अधिवेशनातही हा मुद्दा सातत्याने लावून धरला आहे.

आता नगरविकास विभागाकडून मार्गाचे मार्किंग सुरू झाल्याने आणि भूसंपादन प्रक्रियेला वेग मिळाल्याने लांडगे यांच्या पाठपुराव्याला प्रत्यक्ष प्रशासकीय गती मिळाल्याचे चित्र आहे. चाकण औद्योगिक पट्ट्यात ऑटोमोबाईल, इंजिनिअरिंग, उत्पादन आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रातील मोठ्या उद्योगांची संख्या आहे. मात्र, वाढती वाहतूक कोंडी आणि अपुरी रस्ते क्षमता यामुळे उद्योगांच्या वाहतूक व्यवस्थेवर मोठा परिणाम होत आहे. एलिव्हेटेड कॉरिडॉरमुळे लांब पल्ल्याची वाहतूक अधिक वेगाने पुढे जाण्यास मदत होणार असून, उद्योगांसाठी वेळ, इंधन आणि लॉजिस्टिक्स खर्चात बचत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे चाकणच्या औद्योगिक विकासासाठी हा प्रकल्प 'गेमचेंजर' ठरणार असल्याचे लांडगे यांनी अधोरेखित केले आहे.

### पुणे–नाशिक आर्थिक कॉरिडॉरला नवी ताकद

» नाशिक फाटा–खेड मार्गामुळे केवळ पिंपरी-चिंचवडची वाहतूक कोंडी कमी होणार नाही, तर पुणे–नाशिक आर्थिक पट्ट्याची वाहतूक क्षमता वाढणार आहे. नवीन उद्योग, लॉजिस्टिक्स पार्क, वेअरहाऊसिंग आणि रोजगारनिर्मितीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा आहे. "हा केवळ फ्लायओव्हर नाही, तर पिंपरी-चिंचवडपासून चाकण-खेडपर्यंतच्या औद्योगिक विकासाचा वाहतूक-कणा आहे. मार्किंग सुरू होणे आणि भूसंपादनाला गती मिळणे हे प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. पुढील टप्प्यात भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष बांधकामाला गती मिळावी, यासाठीही आपला पाठपुरावा सुरूच राहणार असल्याचे आमदार महेश लांडगे यांनी स्पष्ट केले.

"नाशिक फाटा–खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर हा केवळ वाहतूक कोंडी सोडविणारा प्रकल्प नाही, तर पिंपरी-चिंचवड, चाकण आणि खेडच्या औद्योगिक विकासाला नवी गती देणारा महत्त्वाचा वाहतूक-कणा आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या प्रकल्पाला मंजुरी दिल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली प्रकल्पाचे भूसंपादन आणि प्रत्यक्ष कामाला सुरुवात व्हावी, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. आज नगरविकास विभागाकडून मार्किंग सुरू झाले असून भूसंपादन प्रक्रियेलाही गती मिळाली आहे. हा प्रकल्प लवकरात लवकर प्रत्यक्षात यावा आणि पुणे महानगर प्रदेशाच्या विकासाला नवी दिशा मिळावी, यासाठी आमचा पाठपुरावा यापुढेही कायम राहील.""

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# समर्थ महिला बहुउद्देशीय संस्थेचा सहावा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

## संस्थेच्या माध्यमातून सक्षम झालेल्या पाच महिला उद्योजिकांचा तसेच सर्वाधिक सदस्य जोडणाऱ्या समन्वयिकेचा विशेष सन्मान करण्यात आला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

समर्थ महिला बहुउद्देशीय संस्थेचा सहावा वर्धापन दिन साधुराम गार्डन मंगल कार्यालय येथे उत्साहात संपन्न झाला. यावेळी संस्थेच्या माध्यमातून सक्षम झालेल्या पाच महिला उद्योजिकांचा तसेच सर्वाधिक सदस्य जोडणाऱ्या समन्वयिकेचा विशेष सन्मान करण्यात आला.



ऋतुजा सांडभोर, मीनाक्षी फरतडे, स्नेहा गिरडकर, अर्चना देशमुख आणि सरिता घोगरे यांना 'सक्षम उद्योजिका' पुरस्काराने गौरविण्यात आले. तर भाग्यश्री जोशी-काटकर यांना 'जास्त सदस्य जोडणाऱ्या समन्वयिका' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमात महिलांचे सांस्कृतिक कार्यक्रम, नाट्य सादरीकरण तसेच विविध गेम शोचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या माध्यमातून सक्षम झालेल्या महिला उद्योजिकांचे विविध वस्तूंचे स्टॉलही यावेळी लावण्यात आले.

संस्थेच्या संस्थापिका राजश्रीताई गागरे यांनी महिलांना कुटुंबाची जबाबदारी सांभाळून व्यवसाय कसा करावा, व्यवसायाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून कसे पाहावे आणि व्यवसायात सातत्य कसे टिकवावे, याबाबत मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे डॉ. श्रद्धा जवंजाळ व पत्रकार मनीषा थोरात तसेच विशेष उपस्थिती म्हणून नगरसेविका अश्विनीताई वाबळे, माजी नगरसेविका सीमाताई सावळे, सामाजिक कार्यकर्त्या श्रद्धाताई लांडगे, डॉ. दिपाली कुलकर्णी, डॉ. क्षमा धुमाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत महिला एकमेकींना साथ देत उद्योग क्षेत्रात पुढे जात असल्याचे नमूद केले. संस्थेने ३२६४ सदस्यांचा टप्पा पार केला असून भविष्यात हा आकडा ५ ते १० हजारांपर्यंत पोहोचेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी लोकरे यांनी केले, तर प्रस्तावना प्रांजल भादले यांनी केली. वर्धापन दिनानिमित्त उपस्थित प्रत्येक महिलेला भेटवस्तू देण्यात आली. यासाठी पूना गाडगीळ अँड सन्स, भोसरी शाखा यांचे विशेष सहकार्य लाभले.

# पुण्यातील ढोल ताशा पथकांबाबत महापौर नागपुरे यांनी केल्या महत्वाच्या सूचना!

**ढोल-ताशा पथकांच्या सरावासाठी महापालिकेने जागा आणि परवानग्या त्वरित उपलब्ध करून द्याव्यात, अशा स्पष्ट सूचना महापौर मंजूषा नागपुरे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत**

**पुणे | प्रतिनिधी**

'गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ढोल-ताशा पथकांना सराव करण्यासाठी महापालिका प्रशासनाने जागा उपलब्ध करून द्याव्यात. सरावासाठी आवश्यक असलेल्या परवानग्यादेखील पथकांना उपलब्ध करून दिल्या जाव्यात,' अशी सूचना महापौर मंजूषा नागपुरे यांनी प्रशासनाला केली आहे.

'सरावासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या घेताना सराव पथकांना अडचणी येऊ नयेत, यासाठी महापालिका प्रशासनाने एक खिडकी व्यवस्था करून सर्व आवश्यक परवानग्या त्या माध्यमातून कशा दिल्या जातील, यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

ढोल-ताशा पथकांना सरावाची परवानगी ऑफलाईन आणि ऑनलाईनदेखील देण्याची व्यवस्था महापालिकेने केली पाहिजे. सरावाच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार प्रकाश व्यवस्था, स्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याची तात्पुरती सुविधादेखील उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने दक्ष राहिले पाहिजे,' असेही महापौर नागपुरे यांनी सांगितले

'ढोल-ताशा पथकांकडून सुरू असलेल्या सरावादरम्यान ध्वनिप्रदूषण, वेळेची मर्यादा आणि वाहतुकीसंदर्भातील नियमांचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे. यासाठी महापालिका प्रशासनाने पोलीस प्रशासनाशी समन्वय साधून स्पष्ट मार्गदर्शक सूचना निश्चित कराव्यात. नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही आणि त्याच वेळी सांस्कृतिक परंपरेलाही प्रोत्साहन मिळेल, यामध्ये योग्य समतोल साधणे आवश्यक आहे,' असे महापौर नागपुरे यांनी सांगितले.

महापौर मंजुषा नागपुरे म्हणाल्या, ढोल-ताशा पथके शहराच्या परंपरेचा अविभाज्य भाग असून, हजारो युवक-युवती शिस्त, संस्कार आणि सांघिक भावनेतून या लोककलेचे जतन व संवर्धन करीत आहेत. ढोल-ताशा पथके ही 'पुण्याची सांस्कृतिक ओळख आहे. ही ओळख पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पथकांना प्रोत्साहन आणि आवश्यक सुविधा मिळणे गरजेचे आहे.

महापालिका प्रशासन पथारी व्यावसायिक व इतरांना सशुल्क परवानगी देते. ढोलपथकेदेखील व्यावसायिक आहेत, एकही पथक मोफत वादन करत नाही. त्यामुळे ढोल पथकांना रेडीरेकनरच्या दरानुसार भाडे व शुल्क आकारावे. महापालिका आयुक्तांना तसे निवेदन देणार आहे,' असे माजी नगरसेवक संजय बालगुडे यांनी सांगितले.



### ढोल ताशा पथकांची मनमानी थांबवा

**» नदीपात्रासह शहरातील अनेक पदपथांवर आणि मोकळ्या जागांवर ढोल ताशा पथकांनी गेल्या पंधरा दिवसापासून सराव सुरू केला आहे. संध्याकाळी सहा वाजल्यानंतर पथकांचा सराव सुरू होतो. त्यामुळे अनेक ठिकाणी आत्तापासूनच मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे. पथकातील मंडळी एकाच वेळी १०० ढोल वाजवतात. त्यामुळे आजूबाजूच्या नागरिकांना त्यांच्या आवाजाचा त्रास होतो. सायंकाळी फिरण्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना आणि लहान मुलांनाही ढोल पथकांच्या मनमानी कारभाराचा त्रास होतो. याबाबत महापालिकेकडे अनेकदा तक्रारी करूनही दखल घेत जात असल्याचे नागरिकांनी सांगितले. महापालिकेने वेळीच ढोल ताशा पथकांवर बंधन न ठेवल्यास येणाऱ्या काळात त्यांची मनमानी अधिक वाढेल आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे अधिकच अवघड होईल अशी भीतीही व्यक्त केली जात आहे.**

### 'पोलिसांशी समन्वय ठेवा'

**» 'ढोल-ताशा पथकांकडून सुरू असलेल्या सरावादरम्यान ध्वनिप्रदूषण, वेळेची मर्यादा आणि वाहतुकीसंदर्भातील नियमांचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे. यासाठी महापालिका प्रशासनाने पोलीस प्रशासनाशी समन्वय साधून स्पष्ट मार्गदर्शक सूचना निश्चित कराव्यात. नागरिकांना कोणतीही गैरसोय होणार नाही आणि त्याच वेळी सांस्कृतिक परंपरेलाही प्रोत्साहन मिळेल, यामध्ये योग्य समतोल साधणे आवश्यक आहे,' असे महापौर नागपुरे यांनी सांगितले.**

### ढोल पथकांकडून शुल्क घ्या

**» दरम्यान, 'महापालिका प्रशासन पथारी व्यावसायिक व इतरांना सशुल्क परवानगी देते. ढोलपथकेदेखील व्यावसायिक आहेत, एकही पथक मोफत वादन करत नाही. त्यामुळे ढोल पथकांना रेडीरेकनरच्या दरानुसार भाडे व शुल्क आकारावे. महापालिका आयुक्तांना तसे निवेदन देणार आहे,' असे माजी नगरसेवक संजय बालगुडे यांनी सांगितले.**

# चाकणमधील उद्योगांचे स्थलांतर थांबविण्यासाठी सरकार 'ॲक्शन मोड'वर!

**रस्ते, वाहतूककोंडी आणि पायाभूत सुविधांच्या दुरवस्थेमुळे कंपन्या परराज्यात किंवा इतर जिल्ह्यात स्थलांतरित होण्याच्या भीतीवर राज्य सरकार 'ॲक्शन मोड'वर आले आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

चाकण परिसरातील पायाभूत सुविधांसह रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत गेल्या काही दिवसांपासून गदारोळ सुरु आहे. रस्त्यांच्या समस्येमुळे चाकणमधील काही कंपन्या महाराष्ट्राबाहेर किंवा राज्यातील अन्य जिल्ह्यांमध्ये स्थलांतरित होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून, त्यातून रोजगारावर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकार 'ॲक्शन मोड'वर गेले असून, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी उद्योजकांशी दूरध्वनीवरून थेट चर्चा सुरू केली आहे.

चाकण हे महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासातील महत्त्वाचे केंद्र असून, येथील उद्योगांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि उद्योजकांना येणाऱ्या अडचणी दूर करणे याला शासनाचे प्राधान्य आहे. रस्ते, वाहतूक तसेच इतर पायाभूत सुविधांबाबत उद्योजकांच्या असलेल्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेऊन संबंधित विभागांच्या समन्वयातून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जाईल. चाकणच्या औद्योगिक विकासाला गती देताना उद्योजकांच्या अडचणी सोडविण्यासाठी शासन सकारात्मक असून, संबंधित सर्व घटकांशी संवाद साधून ठोस निर्णय घेतले जातील, असे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज चाकणमधील औद्योगिक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून चर्चा केली. उद्योजकांच्या समस्या केवळ चर्चेपुरत्या न ठेवता त्या प्रत्यक्ष समजून घेऊन त्यावर मार्ग काढण्याच्या दृष्टीने १६ ऑगस्टला दुपारी ४ वाजता चाकणमध्ये उद्योजक आणि औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसोबत प्रत्यक्ष बैठक घेण्यात येणार आहे.



### नेमका प्रकार काय?

**» चाकण हे देशातील सर्वांत मोठे वाहननिर्मिती केंद्र आहे. मात्र, खराब रस्ते, वाहतूककोंडी आणि पायाभूत सुविधांची दयनीय अवस्था यांचा फटका उद्योगांना बसत आहे. त्यामुळे २० लघुउद्योगांनी सातारा जिल्ह्यातील खंडाळा औद्योगिक क्षेत्रात स्थलांतरित होण्याची तयारी केली आहे. हे उद्योग स्थलांतरित झाल्यास या परिसराचे वार्षिक एक हजार कोटी रुपयांचे नुकसान होऊन सुमारे चार हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार धोक्यात येऊ शकतात.**

# समाविष्ट 16 गावातील 13 लाख नागरिकांना मिळणार पाणी!

**पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या 16 गावांमधील तब्बल 13 लाख नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न लवकरच सुटणार आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रस्तावित करण्यात आलेल्या २०० एमएलडी जलशुद्धीकरण प्रकल्पासाठी खडकवासला येथील केंद्रीय जल आणि ऊर्जा संशोधन केंद्राची (सीडब्ल्यूपीआरएस) सुमारे २.५ हेक्टर जागा मिळण्याची शक्यता आहे. ही जागा जलशुद्धीकरण केंद्रासाठी देण्याबाबत सकारात्मक हालचाली सुरू झाल्या आहेत.

ही जागा पुढील काही महिन्यांमध्ये पुणे महापालिकेला मिळण्याची शक्यता आहे. हा प्रकल्प मार्गी लागल्यानंतर महापालिकेत समाविष्ट झालेल्या १६ गावांमधील अंदाजे १३ लाख नागरिकांना फायदा होणार आहे. या कामामुळे महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावातील नागरिकांना महापालिकेच्या वतीने केला जाणारा पाणीपुरवठा सुरळीत होणार आहे.



## १६ गावांतील १३ लाख नागरिकांना लाभ

» महापालिकेत समाविष्ट झालेल्या १६ गावांतील सुमारे १३ लाख नागरिकांना या प्रकल्पाचा मोठा फायदा होणार आहे. नियमित, पुरेसा आणि विश्वासाई पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी प्रकल्प उपयुक्त ठरणार आहे. खडकवासला, नांदोशी, किरकटवाडी, नांदेड, धायरी, नऱ्हे, जांभुळवाडी, शिवणे यांसह इतर गावांतील पाणीपुरवठा व्यवस्था सुधारण्यास मदत होईल.

खडकवासला येथील केंद्रीय जल आणि ऊर्जा संशोधन केंद्रामध्ये लघु नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी प्रादेशिक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी खडकवासला येथील 'सीडब्ल्यूपीआरएस'च्या सुमारे २.५ हेक्टर जागा २०० एमएलडी जलशुद्धीकरण प्रकल्पासाठी वापरासाठी मिळावी, असा प्रस्ताव मांडला. 'सीडब्ल्यूपीआरएस'चे संचालक सेल्वा बालन यांच्याशी चर्चा करण्यात आली. त्यांनी या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

महापालिकेच्या माध्यमातून उभारण्यात येत असलेल्या २०० एमएलडी जलशुद्धीकरण प्रकल्पामुळे महापालिकेत समाविष्ट झालेल्या १६ गावांमधील अंदाजे १३ लाख नागरिकांना भविष्यातील पाणीपुरवठा व्यवस्थेत मोठा लाभ होणार आहे. या भागातील वाढती लोकसंख्या, नागरीकरण आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेता हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे,' असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले.

'या प्रकल्पामुळे नव्याने समाविष्ट गावांमध्ये पुरेसा, नियमित, विश्वासार्ह आणि शाश्वत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुनिश्चित करण्यास मदत होणार आहे. २.५ हेक्टर जागा प्रस्तावित प्रकल्पासाठी वापर करण्यासाठी मिळालेला सकारात्मक प्रतिसाद लक्षात घेता, पुढील प्रशासकीय व तांत्रिक प्रक्रिया समन्वयाने राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. वाढत्या पुणे शहरासाठी दीर्घकालीन नियोजन, पुणे शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर भविष्यातील पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे आवश्यक आहे.

या प्रकल्पाचा मोठा फायदा खडकवासला, नांदोशी , सणसनगर, किरकटवाडी , नांदेड, धायरी, नऱ्हे, भिलारेवाडी , मांगडेवाडी, निंबाळकरवाडी, कोळेवाडी, जांभुळवाडी, कोंढवे-धावडे, उत्तमनगर, शिवणे या गावांना होणार आहे, असे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या प्रकल्पामुळे समाविष्ट १६ गावातील सुमारे १३ लाख नागरिकांना सुरळीत आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होऊ शकतो. या भागातील नागरिकांसाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार असल्याचाही विश्वास पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## २०० एमएलडी जलशुद्धीकरण प्रकल्प

» पुणे महापालिकेच्या प्रस्तावित २०० एमएलडी जलशुद्धीकरण प्रकल्पासाठी खडकवासला येथील सीडब्ल्यूपीआरएसची सुमारे २.५ हेक्टर जागा मिळण्याची शक्यता आहे. जागा देण्याबाबत सीडब्ल्यूपीआरएस प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिल्याने प्रकल्पाच्या पुढील प्रशासकीय प्रक्रियेला गती मिळणार आहे. वाढत्या पुणे शहराची पाण्याची गरज लक्षात घेता हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे.

## भविष्यातील पाणीटंचाईवर उपाय

» 'वाढती लोकसंख्या, झपाट्याने होणारे नागरीकरण आणि भविष्यातील पाण्याची वाढती मागणी लक्षात घेऊन महापालिकेने या प्रकल्पाचे नियोजन केले आहे. २०० एमएलडी क्षमतेच्या जलशुद्धीकरण केंद्रामुळे नव्याने समाविष्ट गावांमध्ये पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करण्यास मदत होईल. दीर्घकालीन पाणी नियोजनाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# विमानतळ परिसरात बांधकामांसाठी 'ना हरकत'च्या अर्जांमध्ये वाढ...

**लोहगाव विमानतळ परिसरात वाढत्या शहरीकरणामुळे इमारतींच्या बांधकामासाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' (NOC) मागणाऱ्या अर्जांमध्ये तब्बल 32 टक्क्यांनी वाढ झाली आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

वाढत्या शहरीकरणामुळे लोहगाव विमानतळाच्या परिसरात बांधकाम करण्यासाठी 'ना हरकत प्रमाणपत्र' मिळवण्यासाठीच्या अर्जांमध्ये मोठी वाढ झाली आहे. हवाई दलाकडून प्रत्येक प्रस्तावाची छाननी करूनच मान्यता देण्याबाबतचा निर्णय घेतला जात आहे. मात्र, शहराचा वाढता विस्तार आणि विमान वाहतूक सुरक्षा यात समतोल राखणे आव्हानात्मक होत आहे.



भारतीय हवाई दलाच्या आकडेवारीनुसार, बांधकामासाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी २०२० मध्ये १०६२ प्रस्ताव आले होते. तर, २०२५ मध्ये १,४०८ प्रस्ताव दाखल झाले होते. त्यामुळे पाच वर्षांत ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठीच्या प्रस्तावांची संख्या ३२ टक्क्यांनी वाढली आहे. विमानतळाच्या परिसरात निवासी बांधकाम, पुनर्विकास आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांचा वेग वाढल्याने ही वाढ झाल्याचे निरीक्षण हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी नोंदवले.

लोहगाव विमानतळ हवाई दलाच्या अखत्यारित आहे. हवाई दलासह नागरी विमान सेवेसाठी या विमानतळाचा वापर केला जातो. विमानतळाच्या परिसरात कोणतेही बांधकाम करताना त्याची उंची, स्थळ, अंतर अशा विविध घटकांचा विचार केला जातो. तसेच प्रकल्पासाठी संबंधित यंत्रणांकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक असते. गेल्या काही वर्षांत या ना हरकत प्रमाणपत्रासाठी दाखल होणाऱ्या अर्जांमध्ये सातत्याने वाढ झाली आहे. त्यामुळे विमानतळाच्या आसपास शहरीकरण झपाट्याने वाढत असल्याचे निरीक्षण हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी नोंदवले आहे. इंटरनॅशनल सिव्हिल एव्हिएशन ऑर्गनायझेशन (आयसीएओ) या आंतरराष्ट्रीय संघटनेने, तसेच हवाई दलाने विमानतळाच्या परिसरातील बांधकामांवर उंचीच्या मर्यादा निश्चित करण्यात आल्या आहेत. विमानांचे उड्डाण आणि उतरण्याच्या मार्गात कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे.

## उंचीच्या मर्यादा महत्त्वाच्या

» लोहगाव विमानतळ परिसरात कोणतेही बांधकाम करताना इमारतीची उंची, विमानतळापासूनचे अंतर आणि प्रस्तावित ठिकाण यांचा विचार केला जातो. विमानांच्या उड्डाण आणि उतरण्याच्या मार्गात अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी हवाई दल आणि आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार उंचीच्या मर्यादा निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक बांधकाम प्रस्तावाची तांत्रिक तपासणी केल्यानंतरच एनओसी देण्याचा निर्णय घेतला जातो.